# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण कार्यालय नवीन इमारत
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.
संकेतस्थळ : https://mmrda.maharashtra.gov.in दूरध्वनी क्र. : ०२२-२६५९ ४१९७.

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील 'वाहनचालक' या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने कायमस्वरुपी भरण्याबाबत जाहिरात.

### पदाचे नाव, अर्हता, वय, अनुभव व वेतनस्तर

i) **संवर्गाचे नाव** वाहनचालक

ii) **अर्हता** : उमेदवारास लिहिणे आणि वाचण्याचे ज्ञान आवश्यक आहे. उमेदवार हलकी वाहने चालविण्याचे कोणतेही विपरीत शेरा नसलेला परवानाधारक असावा. वाहनाबाबतच्या छोट्या तक्रारी सोडविण्याकरिता संबंधित उमेदवारास यांत्रिकीतील प्राथमिक ज्ञान असावे.

iii) **वय** : मागासवर्गीय उमेदवारांकरिता ४३ वर्षे कमाल वयोमर्यादा.
(प्राधिकरणातील कर्मचारी यांना वयाचे बंधन नाही)

iv) **अनुभव** : मुंबईत गेल्या २ वर्षापासून वाहन चालविण्याचा अनुभव

v) **वेतनस्तर** : एस ०६ : रु.१९,९००-६३,२००/-

| अ. क्र. | समांतर / सामाजिक आरक्षण | महिला (३०%) | माजी सैनिक (१५%) | अंशकालीन पदवीधर / पदविका (१०%) | खेळाडू (५%) | प्रकल्पग्रस्त (५%) | भूकंपग्रस्त (२%) | दिव्यांग (४%) | अनाथ (१%) | सर्व-साधारण | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (१३%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २ | अनुसूचित जमाती (७%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३ | विमुक्त जाती (अ) (३%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४ | भटक्या जमाती (ब) (२.५%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५ | भटक्या जमाती (क) (३.५%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ६ | भटक्या जमाती (ड) (२%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ७ | वि.मा.प्र. (२%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ८ | इतर मागासवर्ग (१९%) | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| ९ | एसईबीसी (१३%) | - | - | - | - | - | - | - | - | २ | २ |
| १० | ईडब्ल्युएस (१०%) | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| ११ | खुला (२५%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | **एकूण** | - | - | - | - | - | - | - | - | ४ | ४ |

**टिप :**

- ➡ वर नमूद पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल/वाढ होण्याची शक्यता आहे.
- ➡ वरील तक्त्यात एस.ई.बी.सी. म्हणजे 'सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग' आहे आणि 'ई.डब्ल्यु.एस' म्हणजे 'आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक' आहे.

## सर्वसाधारण अटी :-

१) अर्जाचा विहित प्र-नमूना प्राधिकरणाचे संकेतस्थळ https://mmrda.maharashtra.gov.in > Home page > Divisions > Adminitration > Recruitment > Application Form वर उपलब्ध आहे.

२) वय, शैक्षणिक अर्हता, पूर्ण वेळ अनुभव व इतर अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे **दिनांक २८/०२/२०२०** पर्यंतचीच वैध असतील. त्यानंतरची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

३) उमेदवारांनी अर्जासोबत वय, शैक्षणिक पात्रता, वाहनचालक परवाना, अनुभव, अधिवास प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलीअर प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र इ. प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवाराचा अर्ज रद्दबातल करण्यात येईल. जर जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर ते नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास नेमणूक तात्काळ कोणत्याही पत्रव्यवहारविना समाप्त करण्यात येईल.

४) अर्जासोबत स्वयंसाक्षांकित केलेल्या सत्यप्रती नसतील किंवा अर्ज अपूर्ण भरलेला असेल किंवा वाचता येण्याजोगा नसेल किंवा विहित नमुन्यात नसेल किंवा फोटोशिवाय असेल किंवा त्यावर स्वाक्षरी केलेली नसेल तर तसा अपूर्ण अर्ज नाकारण्यात येईल आणि त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. उमेदवारांने छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित केल्यास स्वयंसाक्षांकित घोषणापत्राची प्रत जोडावी. स्वयंसाक्षांकित घोषणापत्राची प्र-नमुना जोडला आहे.

५) उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे

६) शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा, दिनांक २८ मार्च, २००५ अन्वये नियम ४ 'अ' अनुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रतिज्ञापत्राचा प्र-नमुना जोडला आहे.

७) शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/महामंडळ सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांनी कार्यालयाचे **"ना हरकत प्रमाणपत्र"** सादर करणे आवश्यक आहे.

८) फक्त पूर्णवेळ कामाचा अनुभव ग्राहय धरला जाईल. अर्धवेळ मानधनावरील सेवा अनुभवात ग्राहय धरली जाणार नाही.

९) निवड प्रकियेदरम्यान व तद्नंतर उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे संशयास्पद वा अयोग्य/अपर्याप्त आढळल्यास उमेदवारांची निवड/नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल. याबाबत उमेदवार स्वत: त्यावरील परिणामांस जबाबदार राहील.

१०) सदर जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या आरक्षणांच्या/ मंजुर पद संख्येमध्ये बदल झाल्यास आरक्षित पदांमध्येही बदल होणार असल्यामुळे त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचा निर्णय अंतिम राहील व तो संबंधितांना बंधनकारक राहील.

११) व्यावसायिक चाचणी व इतर सूचना इत्यादीबाबत तपशील स्वतंत्रपणे प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. व्यावसायिक चाचणीस उपस्थित राहण्यासाठी उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

१२) प्रमाणपत्रांच्या पडताळणी प्रक्रियेवेळी उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रे प्रमाणित प्रमाणपत्रासह सादर करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्र पडताळणी दिनांकानंतर कोणतीही प्रमाणपत्रे सादर केल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाहीत.

१३) उपरोक्त पदांकरीता जर प्रतिक्षासूची तयार करण्यात आली तर त्यातील प्रतिक्षा सूचीवर असलेल्या उमेदवारांचा आवश्यकतेनुसार तथा प्रतिक्षा गुणानुक्रमानुसार नेमणूकीकरीता विचार करण्यात येईल. तथापि, सदर प्रतिक्षासूची कोणत्याही परिस्थितीत एक वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता ग्राहय असणार नाही.

१४) निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार निवड व नियुक्तीसाठी अपात्र ठरविला जाईल.

१५) जाहिरातीच्या अनुषंगाने कार्यवाही न करण्याचे किंवा सदर प्रक्रीया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी राखून ठेवलेले आहेत. तसेच प्राधिकरण कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क राखून ठेवीत आहे.

**विशेष सूचना** :-

१) उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्याचा स्पष्ट उल्लेख ठळक अक्षरात अर्जाच्या पाकीटावर नमूद करावा.

२) उमेदवाराने सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातच अर्ज सादर करावा. सदर अर्जातील माहिती स्पष्ट हस्ताक्षरात लिहावी आणि त्यावर अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो लावून त्यावर स्वाक्षरी आवश्यक आहे.

३) उमेदवारांनी आपले अर्ज **"प्रशासकीय अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व)-४०० ०५१"** या पत्त्यावर विहित नमून्यात संपूर्ण तपशीलासह नोंदणीकृत टपालाव्दारे अथवा हस्तदेय **दिनांक २८/०२/२०२०** रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत प्राप्त होतील असे पाठवावे. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. ई-मेलव्दारे किंवा फॅक्सव्दारे पाठविण्यात आलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**दिनांक : १४ फेब्रुवारी, २०२०**
**ठिकाण : मुंबई**

**सही/-**
**महानगर आयुक्त**
**मुं.म.प्र.वि.प्राधिकरण**